## : निशाणी १६ वर आदेश :

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ने त्याच्याविरुध्द पारित केलेला विना कैफियत सुनावणीचा आदेश रद्द करण्याकरीता केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, सदर दाव्याचे कामी आवश्यक ती कागदपत्रे मिळण्यास उशीर झाला, तसेच तो खेडेगावात राहणारा असून त्यास कोर्ट कामकाजाची माहिती नाही. त्यामुळे त्यास कैफियत वेळेत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता या प्रतिवादीची कैफियत व म्हणणे दाखल होणे हे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब त्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यास त्याची कैफियत व म्हणणे दाखल करण्याची परवानगी दयावी अशी विनंती प्रतिवादी क्र. १ ने केली आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे दाखल करुन नमुद केले की, प्रतिवादी यांनी झालेल्या विलंबाबाबत संयुक्तिक कारणे दिलेली नाहीत. सबब अर्ज फेटाळण्यात यावा.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही बाजुंची कथने विचारात घेता, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रकरणाचा निर्णय गुणवत्तेवर होण्याकरीता प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द विनाकैफियत सुनावणीचा झालेला आदेश रद्द करुन त्यास त्याची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे संयुक्तिक वाटते. परंतु त्याचवेळी प्रतिवादी क्र. १ ने कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाबाबत वादी यांस खर्च (cost) म्हणून रु. ३००/- देउन अर्ज मंजूर करणे योग्य होईल या मतापर्यंत मी आलो असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**: आ दे श :**

१) प्रतिवादी क्र. १ ने वादी यांस खर्च म्हणून रु. ३००/- (रुपये तीनशे मात्र) देण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द झालेला विनाकैफियत सुनावणीचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यास त्याची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

महाड. (अ. वा. क्षिरसागर)
दिनांक : २०.०६.२०१६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड.